९८४९१८३

**अत्यंत महत्वाचे.**

**जा.क्र.शिउसं/माध्य-३(१४)/शै.शुल्क नि./पुवि/२००९/**
**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,**
**पुणे-१ यांचे कार्यालय.**
**दिनांक-०९/०७/२००९.**

28 JUL 2009

**प्रति,**

**संचालक,**
**दि ऑर्चिड स्कूल,**
**स.नं.८०/१/२/१, बाणेर महाळुंगे रोड,**
**बाणेर, पुणे-४११०४५.**

**विषय- शैक्षणिक वर्ष सन २००९-१० पासून शैक्षणिक व अन्य शुल्क नियंत्रण समितीच्या मंजुरीशिवाय न वाढविणेबाबत.**

**संदर्भ-**
**१. शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००९/(१०८/०९)/माशि ३, दिनांक-८ मे, २००९.**
**२. शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००९/(१०८/०९)/माशि ३, दिनांक-११ जून, २००९.**
**३. आपणांकडील पत्र दिनांक-१९/०५/२००९.**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय क्रमांक-३ चे पत्र अवलोकन करावे.

त्यान्वये आपणांस सूचित करण्यात येते की, संदर्भिय १ व २ च्या शासन निर्णयानुसार शासन मान्यता प्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळांना शासनामार्फत गठित केल्या जाणाऱ्या शुल्क नियंत्रण समितीच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची फी वाढ करता येणार नाही. सन २००९-१० या शैक्षणिक वर्षाकरिता ज्या संस्थांनी फी वाढ केली असेल त्यांनाही या समितीची मंजूरी घेणे बंधनकारक राहणार आहे. तसेच शासनाच्या या आदेशाविरुध्द कोणत्याही शाळेने सन २००९-१० पासून शैक्षणिक शुल्कात वाढ केल्यास संबंधित शाळेची परवानगी रद्द करण्यात येऊन शासनामार्फत देण्यात आलेले ना-हरकत प्रमाणपत्रही रद्द करण्यात येणार आहे. त्यानुसार संदर्भीय २ च्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष सन २००९-२०१० पासून शैक्षणिक व अन्य शुल्क निश्चित करण्याकरिता अभ्यास करुन शिफारशी करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

असे असतानाही प्राथमिक/माध्यमिक शाळांच्या शैक्षणिक व अन्य शुल्क वाढीबाबतच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत ही बाब योग्य नाही. तरी आपणांस सूचित करण्यात येते की, सन २००९-२०१० मध्ये शैक्षणिक व अन्य शुल्क यामध्ये पूर्वपरवानगीशिवाय वाढ करण्यात येऊ नये व पालक/विद्यार्थी वर्गाची पिळवणूक होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

तरी तात्काळ कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं. यांची सही असे.

**(बा.मु.ओव्हाळ)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१ करिता.**

**प्रत- शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),**
**जिल्हा परिषद, पुणे यांना माहिती व कार्यवाहीस्तव.**

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा. क्र. ८८२६ /खाप्राशा/०८ - ०९
दिनांक — 26 FEB 2009

मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे ४११ ००१.

विषय : द ऑर्किड स्कूल, बाणेर, पुणे ४५ यांचा इ. ५ वी व इ. ६ वी वर्गमान्यतेबाबतचा प्रस्ताव.

संदर्भ : शाळेचा दिनांक २८/१/२००९ चा प्रस्ताव.

महोदय,

प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटीची द आर्किड स्कूल, बाणेर, पुणे ४५ या शाळेस आपलेकडील पत्र जा. क. ९१२०१–६ दि. ६/१/२००८ अन्वये जून २००५ पासून इ. १ ली च्या वर्गास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या तुकडी मान्यता प्रस्तावानुसार शाळेस जून २००६ – २ री, २००७ – ३ री व जून २००८ पासून इ. ४ थी च्या वर्गास नैसर्गिक वाढीनुसार मान्यता दिलेली आहे. परंतु संस्थेने जून २००७ मध्ये इ. ५ वी व जून २००८ पासून इ. ६ वी चे वर्ग सुरु केलेले आहेत व सदर वर्गांना मान्यता देण्यात यावी. याकरिता प्रस्ताव सादर केलेला आहे.

शाळेने इ. ५ वी व ६ वी चे वर्ग सुरु केलेले असल्याने त्या वर्गांना पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देणेबाबत संस्थेने सादर केलेला प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठवित आहोत.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

आवक शाखा
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे - १.

C:\Masters\Shri\kADARE.doc586

शिक्षण मंडळ कार्यालय. पुणे मनपा
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,
जुना तोफखाना,शिवाजीनगर, पुणे
जा.क्र./खाप्राशा/ ७०२६
दिनांक 2 3 DEC 2008

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,

प्रजा निकेतन एज्यु.सोसा.
दि ऑर्किड स्कूल, बाणेर म्हाळुंगे रोड पुणे-४५

विषय - कायम विनाअनुदानिततत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ - शालेय-शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही.एल.एस. —

प्राशि- ३ दि. —

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक/अतिरिक्त तुकड्या/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | माध्यम | इयत्ता | वर्ग/ तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी | १ ली | प्रथम | २००५ |
| | | २ री | — | २००६ |
| | | ३ री | | २००७ |
| | | ४ थी | | २००८ |
| | | ~~५ वी~~ | | |
| | | ~~६ वी~~ | | |

अटी व शर्ती -

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्यस आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजुर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

TRUE COPY

A. M. MANE
NOTARY GOVT OF INDIA
PUNE
REGN. NO. 2919

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

NOTARY
A. M. MANE
PUNE
MAHARASHTRA
Regn.
No. 2919
GOVERNMENT OF INDIA

NOTARY
SONAWANE MUKUND BHI[illegible]
PUNE AREA
Regd. No. 134[illegible]
GOVERNMENT OF INDIA

Office of Education Department,
Pune Municipal Corporation,
Late. Bhausaheb Shirole Bhavan,
Old Tophkhana, Shivajinagar,
Pune.
O.No. KPS/7036
Date – 23 Dec. 2008

To,
Manager/Principal,
Pradnya Niketan Education Society,
The Orchid School, Baner, Mhalunge Road,
Pune – 45.

Subject : In respect of a permission for the naturally enhanced classes/additional classes of the recognized private primary school on permanent non-grant basis.

Ref. : School Education Department, Government Resolution No. V.L.S. PS-3 Dt.

As per the above referred Government Resolution, a permission is hereby granted to the below mentioned naturally enhanced classes/additional classes on permanent non-grant basis subject to non-insistence of grant in future and on the terms and conditions mentioned hereinbelow :-

| Sr. No. | Medium | Standard | Class | Year of sanction |
|---|---|---|---|---|
| 1. | English | 1st Std. | First | 2005 |
| | | 2nd Std. | First | 2006 |
| | | 3rd Std. | First | 2007 |
| | | 4th Std. | First | 2008 |

**Terms and conditions –**

1. Said school has to make available all the physical, educational and management to all its standards.

2. The school has to implement the syllabus prescribed time to time by the Government.

3. The school has to appoint requisite teacher candidate as per the educational and vocational criteria prescribed time to time by the Government and further as per the Salary

Schedules and Service conditions prescribed by the Government time to time.

4. The school has to maintain the wash room and drinking water facility in clean condition.

5. The number of attendance of students in the school be sufficient enough as per the norms.

6. A precaution is to be taken that, number of attendance of students in other recognized primary school in the same vicinity will not adversely affect due to sanction of the additional classes. Unnatural competition is prohibited.

Sd/-
Educational Chief,
Education Board, Pune Municipal Corporation

NOTARY
SONAWANE MUKUND BHIKAJI
PUNE AREA
Regd. No. 1343
GOVERNMENT OF INDIA

Translated Copy Marathi to English.

M. B. SONAWANE
ADVOCATE & NOTARY
GOVT. OF INDIA
163, Ambedkar Society
Yerawada Pune-6

NOTED AND REGISTERED AT
SERIAL NUMBER 3400/2010
(VI)

29 NOV 2010

Translated by

MR. S N. SEN
M.Com.,LL.B
ADVOCATE
D-5, KASTURBA SOCIETY,
VISHRANTWADI, PUNE-411015

FIVE RUPEES NOTARIAL
FIVE RUPEES NOTARIAL
FIVE RUPEES NOTARIAL
FIVE RUPEES NOTARIAL
FIVE RUPEES NOTARIAL

ऑर्किड स्कूल
बालेवाडी.

शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना
शिवाजीनगर , पुणे–५
जा.क्र.शि.मं. ४२
दिनांक:– २४।७।९

प्रति,

शाळा प्रमुख
सर्व मनपा /अनुदानित / विनाअनुदानीत शाळा,
पुणे महानगरपालिका

विषय :– अल्पसंख्यांकासाठी प्री – मॅट्रीक शिष्यवृत्ती २००९–१०

संदर्भ :– जा. क्र मप्राशिप/ अल्पसंख्यांक /४३८७/२००९–१०

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई –३२.

अल्पसंख्यांक समाजाच्या कल्याणासाठी मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेल्या १५ कलमी कार्यक्रमानुसार राज्य शासनामार्फत शासन निर्णय क्रमांक पप्रंक्रा २००७ (२७०/०७) असंक दि. २३/जुलै २००८ नुसार राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शिख, पारसी या अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ता धारक इयत्ता १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांच्या केंद्र शासनाच्या मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २००८ –०९ पासून लागू करण्यात आली आहे. या वर्षी या शिष्यवृत्ती योजनेची कार्यवाही खालील प्रमाणे असेल.

शिष्यवृत्ती पात्रतेच्या अटी :–

१. सदर योजना राज्यातील इयत्ता १ली ते १० वीच्या सर्व शासकीय/ निमशासकीय मान्यताप्राप्त खाजगी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी लागू आहे.

२. अर्जदार विद्यार्थी मागील वर्षी ५० टक्के पेक्षा जास्त गुणाने उत्तीर्ण झालेला असावा.

३. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रुपये १,००,०००/– पेक्षा कमी आहे असे विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकतात.

४. आलेल्या अर्जामध्ये ज्याचे वार्षिक उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

५. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी केवळ वार्षिक उत्पन्नाची अट लागू राहील.

६. उत्पन्नाचा दाखला व धर्माचा दाखला याबाबतचे घोषणापत्र/प्रतिज्ञापत्र साध्या कागदावर अर्जासोबत देण्यात यावे व शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर रू.१०/– च्या नॉन ज्युडीशियल स्टॅम्प पेपरवर देण्यात यावे.

७. शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्यांनी बँकेमध्ये खाते उघडावे .

९. सदर शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांना इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेता येणार नाही.

१०. सदर शिष्यवृत्तीमध्ये ३० टक्के शिष्यवृत्ती ही विद्यार्थीनींसाठी राखीव राहील.

११. सन २००९--१० या वर्षासाठी केंद्र शासनाने महाराष्ट्रासाठी एकूण २,०२,४०० शिष्यवृत्त्या मंजूर केल्या आहेत.

१२. २००८--०९ मध्ये पात्र झालेल्या आणि शिष्यवृत्तीसाठीच्या अटी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनीही नुतनीकरणासाठी अर्ज भरून सादर करावेत.

उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी पुणे महानगरपालिका हद्दितील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका यांच्याकडे मुख्याध्यापकांमार्फत दि. १२ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करावेत.

यासाठीचे अर्ज मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षा अभियान कार्यालय, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका कै. दादोजी कोंडदेव प्राथ. विदयामंदिर, कसबा पेठ, पुणे ११ येथून उपलब्ध करून घ्यावेत. सदरील फार्म दि. १२ ऑगस्ट पूर्वी मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षा अभियान कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करावेत. अर्जासोबत मुख्याध्यापकांनी एकीकरण तक्ता सादर करावा. सदर अर्ज पालकांकडून स्विकारले जाणार नाहीत.

केंद्र शासनाने उपरोक्त शिष्यवृत्तीचा प्रस्ताव विहित मुदतीत सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्या असल्याने मुख्याध्यापकांनी १२ ऑगस्ट ०९ पूर्वीच अर्ज सादर करावेत.

शिक्षण प्रमुख
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

महाराष्ट्र शासन

क्र. नमाशा २००९/(१९८/०९)/माशि-१

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

दिनांक :- २४ फेब्रुवारी २००९.

प्रति,

संचालक,

द ऑर्कीड स्कूल,

पुणे.

विषय : कायम विनाअनुदानित मान्यताप्राप्त शाळेत
इ. ५ वी व ६ वीच्या वर्गास परवानगी मिळण्याबाबत.

संदर्भ :- आपले दि. २८.१.२००९ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदरहू पत्रासोबत आपण सादर केलेल्या सहपत्रांमध्ये प्राथमिक शाळा परवानगी आदेश व शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र हे आदेश सादर केलेले आहेत. सी.बी.एस.इ. संलग्नित शाळांना शासनाचे केवळ ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते व या अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांचे वर्ग प्रीप्रायमरी ते इ. सहावी एकाच वर्षी सुरु केले जाऊ शकतात. या संदर्भातील उल्लेख सीबीएसई - बायलॉजमध्ये करण्यात आलेला आहे. आपणाद्वारे संचलित शाळेमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम चालविण्यात येत असेल तर या शाळेस शासनाच्या वेगळ्या परवानगी आदेशाची आवश्यकता नाही. तसेच इ.५ वी ते ६ वीच्या वर्गांनादेखील शासन किंवा क्षेत्रीय अधिका-यांच्या परवानगीची गरज नाही. तथापि राज्य मंडळ- बालभारती अभ्यासक्रम जर प्राथमिक शाळेत शिकविला जात असेल तर इ.५ वी ते ७ वीचे वर्ग जोडण्यासंदर्भातील परवानगी देण्याचे अधिकार संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना आहेत.

आपली विश्वासू,

सुवर्णा खरात

( डॉ. सुवर्णा सि.खरात)

प्रत-

विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.

८.शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तेयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.
९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमानेन शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्येविनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपल्बध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- **८०,००० चौ.फुट**
- एकूण बांधकामाचे क्षेत्र. **:- १०८० चौ.फुट**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ.:- **३५६४ चौ.फुट**
- वर्ग खोल्यांची संख्या. **:- ३८**
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली. **:- ०३**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? **:-**

| | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास | १० | १० |
| मुताऱ्या | २५ | २५ |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा **: आहे.**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर. **:- लागू नाही**
- अध्यापन अध्ययन साहित्य /खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता.**:- आहे.**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.**:-आहे.(पुस्तक संख्या-८०००,नियतकालिक/वर्तमानपत्र: ३४ )**

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.
१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
१३. शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६०(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.
१६.तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक **जा.क्र. प्राथ./स्वयंअशाळा/इं/सीबीएससी/केएचडी/ /२० -** असा आहे तसेच आपल्या शाळेचा **U-DISE No. २७२५१४००२०९२** हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.
१७. मा. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.
१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

**नमुना २**

**कायम विना अनुदानीततत्वावर**
(मराठी,**इंग्रजी**, हिंदी, उर्दू,तामिळ इत्यादी माध्यम)

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्राशा/३७२/२०२०**
**पुणे १ दिनांक - २१/०८/२०२०**

**प्रति,**

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी संचलित,**
**दि ऑर्किड स्कूल, सर्व्हे नं. ८०/१/२/१, बाणेर महाळुंगे रोड बाणेर,पुणे ४५**

**विषय :- बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याचा नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.**

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे. मी **शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे** दिनांक **१ एप्रिल २०१९ पासून दिनांक ३१ मार्च २०२२** पर्यंतच्या कालावधीसाठी **इ. १ ली ते ८ वी** करिता **प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी संचलित, दि ऑर्किड स्कूल, सर्व्हे नं. ८०/१/२/१, बाणेर महाळुंगे रोड बाणेर,पुणे ४५** यांनातात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे. :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) शाळा पालन करील.

.३. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म,जात,किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

**७. (एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**(दोन)**कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)**कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)**प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

**(पाच)**विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

**(सात)** अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि

**(आठ)** शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करेल.

जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुवि/०४
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 07 JUN 2006

प्रति,

शिक्षण प्रमुख,
महागरपालिका शिक्षण मंडळ,
पुणे.

**विषय** : सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम - इंग्रजी). . .

**संदर्भ** : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक नप्राशा-१७०६/(११४/०६)/प्राशि-३, दिनांक १६ मे, २००६

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व संपूर्ण पत्ता | प्रस्तावित शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, ३ रायसोनी कॉम्प्लेक्स न्यु फ्रेंडस् सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे | म्हाळुंगे, बाणेर रोड | इंग्रजी | १ ली |

**कायम विनाअनुदानीत**

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेश समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करून ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता.)

मूळप्रतीवर मा. शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

**१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२**
**२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**
**३. मा. अध्यक्ष/सचिव** प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, ३ रायसोनी कॉम्प्लेक्स न्यु फ्रेंडस् सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे

C:\Documents and Settings\omsai1\Cookies\My Documents\AJ\NPS050.doc

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा.क्र. ७७६५ /खाप्राशा/०६ - ०७
दिनांक — २७/७/०६

व्यवस्थापक,
प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसा.
स.नं.८०/१/२/१ बाणेर,
म्हाळुंगे रोड सिग्नेट कॉर्नरजवळ,
बाणेर पुणे ४५

विषय : इ.२री च्या वर्गाला परवानगी देणेबाबत.
संदर्भ : १) तुमचे दि.२९.५.०६ चे पत्र
२) मा. शिक्षण उपसंचालक पुणे यांचे जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुवि/११९६९/७२/०१/०६-०७ दि.७.६.०६

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये तुमचे संस्थेच्या द आर्किड स्कूल बाणेर पुणे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस प्रस्तावित मान्यता देणेत आलेली आहे.

तरी शाळेस शासनाची अंतीम मान्यता पत्र मिळालेनंतर शासन पत्रानुसार ३० सप्टेंबरच्या विदयार्थी संख्येनुसार इ.२री च्या वर्गवाढीचा प्रस्ताव सादर करावा.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

C:\Masters\Shri\KADARE.doc328

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे मनपा
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,
जुना तोफखाना,शिवाजीनगर, पुणे
जा.क्र./खाप्राशा/ ००२६
दिनांक 2 3 DEC 2008

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,

प्रजा निकेतन एज्यु. सोसा.
दि ऑर्किड स्कूल; बाणेर, म्हाळुंगे रोड पुणे - ४५

विषय - कायम विनाअनुदानिततत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ - शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही.एल.एस. —

प्राशि- ३ दि. —

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक/अतिरिक्त तुकड्या/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | माध्यम | इयत्ता | वर्ग/ तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी | १ ली | प्रथम | २००५ |
| | | २ री | | २००६ |
| | | ३ री | — | २००७ |
| | | ४ थी | | २००८ |
| | | ~~५ वी~~ | | |
| | | ~~६ वी~~ | | |

अटी व शर्ती -

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.

२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.

६. सदर मंजुर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा.क्र. ८८२६ /खाप्राशा/०८ - ०९
दिनांक —
2 6 FEB 2009

मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे ४११ ००१.

विषय : द ऑर्किड स्कूल, बाणेर, पुणे ४५ यांचा इ. ५ वी व इ. ६ वी वर्गमान्यतेबाबतचा प्रस्ताव.

संदर्भ : शाळेचा दिनांक २८/१/२००९ चा प्रस्ताव.

महोदय,

प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटीची द आर्किड स्कूल, बाणेर, पुणे ४५ या शाळेस आपलेकडील पत्र जा. क. ९१२०१–६ दि. ६/१/२००८ अन्वये जून २००५ पासून इ. १ ली च्या वर्गास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या तुकडी मान्यता प्रस्तावानुसार शाळेस जून २००६ – २ री, २००७ – ३ री व जून २००८ पासून इ. ४ थी च्या वर्गास नैसर्गिक वाढीनुसार मान्यता दिलेली आहे. परंतु संस्थेने जून २००७ मध्ये इ. ५ वी व जून २००८ पासून इ. ६ वी चे वर्ग सुरु केलेले आहेत व सदर वर्गांना मान्यता देण्यात यावी. याकरिता प्रस्ताव सादर केलेला आहे.

शाळेने इ. ५ वी व ६ वी चे वर्ग सुरु केलेले असल्याने त्या वर्गांना पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देणेबाबत संस्थेने सादर केलेला प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठवित आहोत.

आवक शाखा
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे - १.

(सही)
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

C:\Masters\Shri\kADARE.doc586